सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-414, चौथा मजला, मादाम कामा मार्ग,**
**हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-400 032**

**दूरध्वनी क्र : 022-22793171**

**जा. क्र.- JDHEMumbai/NOC/2024/39** **दिनांक - 12.08.2024**

**प्रति,**
**अध्यक्ष / सचिव / प्राचार्य,**
S.N.D.T.Women's University, Juhu Tara Road, Santacruz (W) Mumbai - 400 049.
Sir Vithaldas Thackersey College of Home Science,(Empowered Autonomous Status)

**विषय : ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत.**

**संदर्भ : -**

1. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. 2013/(447/13)/विशि-1 दिनांक 22.01.2014.
2. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.न्यायाप्र-2014/(प्र.क्र.321/14)/विशि-1 दिनांक 10.4.2015 व दिनांक 24.8.2015.
3. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-2017/प्र.क्र.170/मशि-5 दिनांक 23.4.2018.
4. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-1513/प्र.क्र.125/मशि-5 दिनांक 03.11.2018.
5. विधि व न्याय मंत्रालय, भारत सरकार यांचा The entral Educational Institutions(Reservation in Teachers Cadre) Act, 2019.
6. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. आढावा-1513/प्र.क्र.125(भाग-8)/ म.शि.-5, दिनांक 12.11.2021.
7. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक सवर्गातील आरक्षण) अधिनियम, 202, सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्रमांक बीसीसी-2021/प्र.क्र.858/16-ब, दिनांक 01.4.2022.
8. उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन अधिसूचना क्रमांक संकीर्ण-2019/प्र.क्र.94/ 19/विशि-1, दिनांक 08.4.2022.
9. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-2019/ प्र.क्र.94/19/ विशि-1, दिनांक 11.4.2022.
10. शासन निर्णय क्र.- आढावा -1513/प्र.क्र.125 (भाग-8/मशि.5,दिनांक 25 मार्च,2023)
11. शासन निर्णय शुध्दीपत्रक क्र.- आढावा -1513/प्र.क्र.125 (भाग-8/मशि.5,दिनांक 27 मार्च,2023)
12. शासन निर्णय क्र.:आढावा-1513/प्र.क्र.125/म.शि.-5 दि. 24.07.2023
13. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी 2024/ प्र.क्र.75/16-क,दि. 27.02.2024

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाच्या आस्थापनेवरील प्राचार्य/सहाय्याक प्राध्यापक/ग्रंथपाल/शारिरीक शिक्षण संचालक/प्रयोगशाळा सहाय्यक या संवर्गातील खालील तक्त्यामधे उल्लेखिलेल्या पदांसमोर दर्शविल्याप्रमाणे नवीन आरक्षण धोरणानुसार मागासवर्गीय कक्षाने निश्चित केलेल्या त्या-त्या प्रवर्गासाठी आरक्षित केलेल्या पदांवर खालील विहीत अटी व शर्तीच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहेः-

| अ.क्र (1) | पदनाम (2) | अनुज्ञेय पदे (3) | भरलेली पदे (4) | रिक्त पदे (5) | सद्यस्थितीत भरावयाची पदे (6) | शेरा (7) |
|---|---|---|---|---|---|---|
| **Teaching Staff** | | | | | | |
| 1 | Principal | 1 | 0 | 1 | 1 | रकाना क्र.6 मध्ये दर्शविलेली पदे ही मा.न्यायालयामध्ये दाखल या. क्र. 12051/2015 च्या अंतिम निकालाच्या अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे. |
| | **एकुण** | **1** | **0** | **1** | **1** | **-** |

**भरावयाच्या पदांचे आरक्षण पुढील प्रमाणे राहील.**

| अ.क्र. | पदसंख्या | बिंदूनामावलीनुसार मागाससवर्ग कक्षाने निश्चित केलेले प्रवर्ग |
|---|---|---|
| 1 | 1 | Open(1-Principal) |
| **एकुण** | **1** | |

**अटी व शर्ती :-**

I. शिक्षकीय व शिक्षकेतर पदभरतीसाठी पद अनुज्ञये करताना दिनांक 01.10.2017 रोजी सदरचे पद रिक्त असणे आवश्यक आहे. सदरहू रिक्त पदावरच पदभरती करण्याची खातरजमा संबंधीत विभागीय सहसंचालक यांनी करावी. या दिनांकानंतर रिक्त झालेले पद पदभरतासाठी कोणत्याही परिस्थितीत अनुज्ञेय करण्यात येऊ नये. अशा प्रकारच्या नियुक्त्या झाल्यास संबंधीत विभागीय सहसंचालक हे सर्वस्वी जबाबदार राहतील.
II. शिक्षकीय व शिक्षकेतर या संवर्गातील पदभरतीसाठी मागासवर्गीय कक्षाकडून आरक्षण निश्चित करुन घेतलेल्या पदांची बिंदुनामावलीनुसारच पदे भरण्यात यावीत. प्रवर्गनिहाय सामाजिक आरक्षण, सामाजिक आरक्षणाव्यतिरिक्त आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आरक्षण व समांतर आरक्षण (महिला, खेळाडू, अपंग इ.) तपासूनच पदभरती करण्यात यावी. अनुशेषाची पदे प्राधान्याने भरण्यात यावीत.
III. शिक्षकीय व शिक्षकेतर पदभरतीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 मधील विहीत तरतदींनुसार भरती प्रक्रीयेमध्ये शासन व विद्यापीठ प्रतिनिधी उपस्थित नसल्यास, सदरची भरती प्रक्रीया अवैध समजण्यात यावी. तथापि, सदरच्या विहीत प्रक्रीयेस बगल देऊन संस्थेने/महाविद्यालयाने नियुक्ती आदेश दिल्यास आणि त्यास संबंधित विभागीय सहसंचालक/विद्यापीठ यांनी मान्यता दिल्यास, संबंधीत विभागीय सहसंचालक हे सर्वस्वी जबाबदार राहतील.
IV. शिक्षकीय पदे भरतांना उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा 7 व्या वेतन आयोगाचा शासन निर्णय क्रमांक Misc-2018/CR-56/18/UNI-1, दिनांक 08.3.2019 तसेच शुद्धीपत्रक क्रमांक Misc-2018/CR-56/18/UNI-1, दिनांक 10.5.2019 मधील विहीत तरतुदी तसेच त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा आणि शिक्षकेतर

पदांच्यासंदर्भात शासनाच्या दिनांक 26.8.1999 मधील विहीत तरतुदी विचारात घेऊनच, पदांसाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अहर्ता/पात्रता तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, 2016 मधील विहीत तरतुदी आणि शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

V. सदर पदांची नियुक्ती करताना प्रचलित विद्यापीठ कायद्यानुसार शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या विहीत निवड समितीमार्फतच निवड करण्यात यावी. विहीत कार्यपद्धतीचा अवलंब न करता भरलेले पद रद्द करण्यात येईल व नियुक्तीच्यासंदर्भात भविष्यात न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागीय सहसंचालक यांची राहील.

VI. शिक्षकीय व शिक्षकेतर पदांच्या निवड प्रक्रियेसाठी प्रचलित नियमातील/परिनियमातील तरतुदींचा विचार करुन उमेदवारांची पात्रता निश्चित करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील. तसेच प्रचलित नियमास बगल देऊन नियुक्ती देण्यात आल्यास, संबंधित विभागीय सहसंचालक/विद्यापीठ/प्राचार्य/व्यवस्थापन हे सर्वस्वी जबाबदार राहतील.

VII. शिक्षकीय व शिक्षकेतर पदांची पदभरती करताना नवीन आरक्षण धोरणानुसार मागासवर्गीय आरक्षण कक्षाकडून आरक्षण निश्चित करुन घेतलेल्या बिंदुनामावलीनुसारच पदभरती करण्यात यावी.

VIII. अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त असलेल्या महाविद्यालयास नवीन आरक्षण धोरण लागू नसल्याने, आरक्षण धोरणाच्या अटी व शर्ती त्यांना लागू होणार नाही.

IX. शिक्षकीय व शिक्षकेतर या सवर्गातील पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची प्रतिनियुक्तीने इतरत्र पदस्थापना करण्यात आली असल्यास, सदर रिक्त पदावर कोणत्याही परिस्थितीत नवीन नियुक्ती करण्यात येणार नाही. अशा प्रकारच्या पदांचा समावेश पदभरतीच्या प्रस्तावात करण्यात आल्यास, त्याची सर्वस्वी जबाबदारी ही प्राचार्य व संस्थेची राहील.

X. शिक्षकीय व शिक्षकेतर पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याने धारणाधिकार ठेवला असल्यास, सदर रिक्त पदावर कोणत्याही परिस्थितीत धारणाधिकार संपुष्टात येईपर्यंत नवीन नियुक्ती करण्यात येणार नाही आणि अशा प्रकारच्या नियुक्त्या केल्यास प्राचार्य व संस्था सर्वस्वी जबाबदार राहील.

XI. शिक्षकीय व शिक्षकेतर पदे भरताना महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या अर्हता, अनुभव, व्यावसायिक पात्रता यांचे तंतोतंत पालन करून, सदरची पदभरती करण्यात यावी. याबाबतीत अनियमितता झाल्यास त्याला सर्वस्वी विभागीय सहसंचालक/विद्यापीठ/प्राचार्य/ संस्थेचे व्यवस्थापन जबाबदार राहतील.

XII. अनुज्ञेय शिक्षकीय व शिक्षकेतर पदे निश्चित करण्यासाठी मंजूर तुकडी, तुकडीची विद्यार्थी क्षमता व आवश्यक ते सर्व निकष व नियमांचे अनुपालन करुन पदे अनुज्ञेय केल्याबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित सहसंचालक (उच्च शिक्षण) यांची राहील.

XIII. शिक्षकीय व शिक्षकेतर या संवर्गातील अतिरिक्त पदांचे समायोजन केले असल्याची पुन:श्च खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित सहसंचालक (उच्च शिक्षण) यांची राहील.

XIV. ना-हरकत प्रमाणपत्र मिळाल्याच्या दिनांकापासून पद भरण्याची कार्यवाही सहा महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावी. सहा महिन्यांनंतर सदरचे ना-हरकत प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.



(श्री. अशोक शं. मांडे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन